पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक ग्रामीण,
पोलीस मुख्यालय आडगाव, नाशिक - पिन ४२२००३, दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१०
E.Mail- pilcbnskr@gmail.com

---

**प्रेसनोट** दिनांक:- ०२/११/२०१८

# नाशिक ग्रामीण पोलीस मुख्यालयात आरोग्य शिबीर व रोजगार मेळावा संपन्न

---

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे साो.** यांचे संकल्पनेतुन पोलीस दलात कार्यरत असलेले पोलीस कर्मचा-यांचे पाल्यांसाठी रोजगार मेळावा तसेच पोलीस कर्मचारी व त्यांचे कुटूंबियांसाठी आरोग्य शिबीराचे आयोजन आज रोजी ग्रामीण पोलीस मुख्यालयातील बहुउद्‌देशीय हॉल येथे करण्यात आले होते.

क्रेंद्र सरकारच्या रोजगार निर्मिती कार्यक्रमाअंतर्गत नाशिक ग्रामीण पोलीस दल तसेच अनुगामी लोकराज्य महाभियान (अनुलोम) संस्था व NEEM संस्थेच्या संयुक्त विद्यमाने ग्रामीण पोलीस मुख्यालयातील बहुउद्‌देशीय हॉलमध्ये पोलीस पाल्यांसाठी रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला होता. सदर मेळाव्यात जिल्हाभरातील ६४ पोलीस पाल्यांनी सहभाग नोंदविला होता. पुणे शहरातील नामांकित डेक्कन मॅनेजमेंट कन्सलटंट स्किल फाउंडेशन यांचे सहकार्याने उपस्थित असलेल्या एकुण १६ पोलीस पाल्यांना **मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे साो.** यांचे हस्ते नियुक्ती पत्रके प्रदान करण्यात आली. तसेच उर्वरीत उमेदवारांना दुस-या टप्प्यात बोलावुन ऑनलाईन पध्दतीने नियुक्ती देण्यात येणार आहे. यावेळी मा.पोलीस अधीक्षकांनी उपस्थित तरूण-तरूणींना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या, तसेच संघर्षाशिवाय यश शक्य नसुन गुणवत्ता, कौशल्य, कष्ट करण्याची मानसिकता यावर यश अवलंबुन असल्याचे प्रतिपादन केले.

तसेच सदर मेळाव्यानंतर जिल्हा पोलीस दलातील अधिकारी व कर्मचारी तसेच पोलीस कुटूंबियांसाठी भव्य आयोग्य शिबीरही घेण्यात आले. शिबीरात तज्ञ डॉक्टारांकडुन पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच कुटूंबातील सदस्यांच्या हृदयरोग, हस्थिरोग, मधुमेह, रक्तदाब, ईसीजी, मेंदुचे ताणतणाव, दमा, सांधेचे विकार, अशा विविध शारिरीक चाचण्या करण्यात आल्या. ‘‘सद्रक्षणाय खलनिग्रहणाय’’ या ब्रीतवाक्यानुसार पोलीस सर्वसामान्यांचे रक्षण करण्यास सतर्क असतात, मात्र त्यांच्या आरोग्याच्या रक्षणाबाबत सगळीकडेच उदासीनता दिसुन येते. पोलीसांचे आरोग्य उत्तम राहिले तर ते गुन्हेगारीमुक्त समाज घडवु शकतात, असे प्रतिपादन मा.पोलीस अधीक्षक साो यांनी शिबीरात केले.

नाशिक ग्रामीण पोलीस दलातर्फे आयोजित शिबीरात नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे**, मा.अपर पोलीस अधीक्षक श्री. विशाल गायकवाड, पोलीस उपधीक्षक मुख्यालय श्री. सुरेश जाधव, पोलीस निरीक्षक मानव संसाधन विभाग श्री. रत्नपारखी, राखीव पोलीस उपनिरीक्षक श्री. साहेबराव जाधव यांचेसह अनुलोम संस्थेचे पदाधिकारी श्री. अमित डमाळे, श्री. उमेश पवार, श्री. तौफिक शेख, सागर भामरे, तसेच डेक्कन मॅनेजमेंट कन्सटंट संस्थेचे श्री.सतिष माळी असे उपस्थित होते. तसेच आरोग्य शिबीरात डॉ. गिरीष काळे (हृदयरोग तज्ञ), व डॉ. सोनल काळे (स्त्रीरोगतज्ञ) यांचे मार्फतीने उपस्थित पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच कुटूंबियांची तपासणी करण्यात आली.